# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 09 April 2025

Time 18.10 to 18.20

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – ०९ एप्रिल २०२५ सायंकाळी ६.१०**

********

- हवामान बदलाच्या संकटावर जैन समाजाची शाश्वत जीवनशैली हाच उपाय– पंतप्रधानांचं प्रतिपादन
- जल व्यवस्थापनाच्या आधुनिकीकरणासाठी देशभरात ७८ पथदर्शी योजना राबवण्याचा केंद्रीय मंत्रिमंडळाचा निर्णय
- रिझर्व्ह बँकेचं पहिल्या तिमाहीतलं पतधोरण जाहीर–रेपो दरात पाव टक्के कपात
- सेवा संकल्प शिबीर उपक्रमाचं विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांच्याकडून कौतुक

आणि

- जून ते सप्टेंबर कालावधीत देशात सरासरीच्या सुमारे १०३ टक्के पावसाचा अंदाज

********

हवामान बदल हे आजचे सर्वात मोठं संकट असून जैन समुदायानं शतकानुशतके पाळलेली शाश्वत जीवनशैली हाच त्याचा उपाय असल्याचं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. नवी दिल्ली इथे नवकार महामंत्र दिवसानिमित्त एका सभेला ते संबोधित करत होते. नवकार महामंत्र हा जैन धर्मातल्या अहिंसा, नम्रता आणि आध्यात्मिक उन्नतीच्या तत्वांचा मंत्र आहे. साधेपणा, संयम आणि शाश्वतता ही जैन समाजाच्या जीवनाचं मूळ असल्याचं पंतप्रधानांनी नमूद केलं. ते म्हणाले –

**बाईट – पंतप्रधान नरेंद्र मोदी**

या कार्यक्रमात १०८ पेक्षा अधिक देशांच्या नागरिकांसोबत पंतप्रधानांनी नवकार महामंत्राचं पठण केलं.

****

मुंबईत राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या प्रमुख उपस्थितीत नवकार महामंत्र दिन सामुहिक मंत्रजपाच्या माध्यमातून साजरा करण्यात आला. समाजात शांती आणि सौहार्दाचं वातावरण असल्याशिवाय विकसित राष्ट्राचं ध्येय गाठता येणार नाही, असं मत राज्यपालांनी व्यक्त केलं.

****

केंद्रीय मंत्रिमंडळाने कमांड एरिया डेव्हलपमेंट आणि जल व्यवस्थापनाच्या आधुनिकीकरणाला मान्यता दिली आहे. पंतप्रधान कृषी सिंचन योजनेच्या उपाययोजना म्हणून राबवल्या जाणाऱ्या या ७८ पथदर्शी योजनांमध्ये ८० हजार शेतकऱ्यांचा समावेश केला जाणार आहे. आज मंत्रिमंडळ बैठकीनंतर माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी याबाबत माध्यमांना माहिती दिली. या योजनेमुळे शेतकऱ्यांना पाण्याच्या प्रत्येक थेंबाची जास्त पीक घेण्यास मदत होईल, असं वैष्णव यांनी सांगितलं. ते म्हणाले –

**बाईट – अश्विनी वैष्णव, माहिती आणि प्रसारण मंत्री**

****

राज्यातील आरोग्य उपकेंद्र ते संदर्भ सेवा रुग्णालयांपर्यंत असलेल्या विविध आरोग्य संस्थांचं बळकटीकरण करण्यासाठी एक विस्तृत प्रकल्प अहवाल तयार करण्याची सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे. विकास बँकेच्या सहकार्याने वैद्यकीय शिक्षण आणि सार्वजनिक आरोग्य विभागाच्या प्रकल्पांबाबत झालेल्या बैठकीत ते आज बोलत होते. ज्याठिकाणी महाविद्यालयांसाठी सार्वजनिक आरोग्य विभागाची रुग्णालयं संलग्न करण्यात आली आहेत अशा ठिकाणी, लोकसंख्या आणि रुग्णसंख्येच्या भारानुसार स्वतंत्र रुग्णालय निर्माण करण्याच्या सूचनाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिल्या. अमरावती, वाशिम आणि धाराशिव इथली रुग्णालये निविदा स्तरावर असल्याची माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली.

****

मुंबईतील पु ल देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीच्या नूतनीकृत ‘स्वरगंधर्व सुधीर फडके दृक-श्राव्य संकुला’चं लोकार्पण आज प्रसिध्द गायक संगीतकार श्रीधर फडके यांच्या हस्ते करण्यात आलं, सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांच्यासह अनेक मान्यवर यावेळी उपस्थिती होते.

****

भारतीय रिझर्व्ह बँकेचं चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीतलं पतधोरण आज जाहीर झालं. बँकेने रेपो दरात पाव टक्के कपात करून तो ६ टक्क्यांवर आणला आहे. रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी ही माहिती दिली. २०२५-२६ साठीचा सकल देशांतर्गत उत्पादनासाठीचा अंदाजित दर सहा पूर्णांक ७ दशांश टक्क्यांवरून साडेसहा टक्क्यांपर्यंत तर किरकोळ महागाई दर ४ टक्के राहण्याचा अंदाज असल्याचंही मल्होत्रा यांनी सांगितलं.

****

'प्रत्यक्ष कर विवाद से विश्वास' या योजने अंतर्गत थकीत कर भरण्याची मुदत ३० एप्रिलला संपत आहे. केंद्रीय प्रत्यक्ष कर मंडळानं एका अधिसूचनेद्वारे ही बाब जाहीर केली आहे.

****

भारतीय नौदलासाठी फ्रान्सकडून २६ राफेल सागरी लढाऊ विमाने खरेदीच्या ६३ हजार कोटी रुपयांच्या कराराला सुरक्षा विषयक कॅबिनेट समितीने मंजुरी दिली आहे. या करारांतर्गत भारतीय नौदलाला २२ एक आसनी आणि ४ दोन आसनी अशी एकूण २६ अत्याधुनिक राफेल सागरी लढाऊ विमानं मिळणार आहेत. ही लढाऊ विमाने आयएनएस विक्रमादित्य आणि आयएनएस विक्रांत सारख्या भारतीय विमानवाहू जहाजांवर तैनात केली जाणार असल्याचं सूत्रांनी सांगितलं.

****

शासनाच्या लोकोपयोगी योजना जनतेपर्यंत पोहोचवण्यासाठी सेवा संकल्प शिबीर, हा उपक्रम कौतुकास्पद असून, या शिबीराचा लाभ जनतेने अवश्य घ्यावा, असं आवाहन विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांनी केलं आहे.

परभणी जिल्ह्यात सेलू इथं सेवा संकल्प शिबीरात ते आज बोलत होते. सेलू हे सौर शहर करण्याचा संकल्प निश्चितपणे पूर्ण होईल, तसंच परभणी जिल्ह्याच्या विकासासाठी आवश्यक सहकार्य करण्याची ग्वाही राम शिंदे यांनी दिली. राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यावेळी उपस्थित होत्या. शासनाची प्रत्येक योजना जिल्ह्यात प्रभावीपणे राबवण्याचा कसोशीने प्रयत्न केला जाईल, असं बोर्डीकर यांनी सांगितलं.

****

मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम २०२४-२५ अंतर्गत छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात १ हजार १५ कर्ज प्रस्तावांना मंजूरी देऊन १०० टक्के उद्दीष्टपूर्ती झाली आहे. जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक स्वप्निल राठोड यांनी ही माहिती दिली आहे. या आर्थिक वर्षात जिल्ह्याला ९८६ इतके उद्दिष्ट देण्यात आले होतं. यासंदर्भात आज केंद्राच्या वतीने उत्कृष्ट समन्वयासाठी आणि मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेचे उद्दिष्ट पूर्ण झाल्याने जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांचे आभार मानण्यात आले. प्रत्येक बँकनिहाय प्रलंबित प्रस्तावांचा पाठपुरावा नियमितपणे करण्याचे जिल्हाधिकारी स्वामी यांचे निर्देश होते.

****

येत्या १४ एप्रिल ते २० एप्रिल दरम्यान छत्रपती संभाजीनगर महानगर पालिकेच्यावतीने अग्निशमन सेवा सप्ताह साजरा करण्यात येणार आहे. या सेवा सप्ताह दरम्यान अग्निशमन सेवांचे संयुक्त संचलन, व्याख्याने, प्रात्यक्षिके, प्रदर्शन तसंच हुतात्मा जवानांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत म्हणून निधी संकलन केलं जाणार आहे. १४ एप्रिल रोजी आयुक्त जी श्रीकांत यांच्या हस्ते ध्वजारोहण होऊन सप्ताहाचं उद्घाटन होईल. १९४४ साली मुंबई गोदीत झालेल्या स्फोटात, वीरमरण आलेल्या अग्निशमन अधिकारी-कर्मचाऱ्यांना अभिवादन केलं जाईल अशी माहिती अग्निशमन अधिकारी एस.के.भगत यांनी दिली.

****

जून ते सप्टेंबर कालावधीत देशात सरासरीच्या सुमारे एकशे तीन टक्के पाऊस होईल, असा अंदाज हवामान विषयक खासगी संस्था ‘स्कायमेट’ने व्यक्त केला आहे. प्राथमिक अंदाजानुसार, यंदाचा पावसाळा देशासाठी सकारात्मक ठरण्याची शक्यता या अहवालात वर्तवण्यात आली आहे. यंदाच्या मान्सून हंगामात ‘ला निना’ स्थिती कमकुवत राहण्याची शक्यता असून, ‘अल निनो’चा फारसा प्रभाव जाणवणार नाही. त्यामुळे देशात एकंदर मान्सूनची स्थिती अनुकूल राहण्याची शक्यता स्कायमेटने व्यक्त केली आहे. जलसंधारण, पाणीसाठा व्यवस्थापन आणि शेती योजना आखण्यासाठी हा अंदाज उपयुक्त ठरणार आहे.

***

हवामान

राज्यात सर्वाधिक तापमान अकोला इथं ४४ पूर्णांक एक अंश सेल्सिअस इतकं नोंदवलं गेलं. मराठवाड्यात धाराशिव इथं ४० अंश, छत्रपती संभाजीनगर इथं ४१

पूर्णांक सहा तर परभणी इथं ४१ पूर्णांक तीन अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली.

****

प्रस्तावित शक्तिपीठ महामार्ग रद्द करावा, या मागणीसाठी आज हिंगोली जिल्ह्यात डोंगरकडा इथं आंदोलन करण्यात आलं. स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष राजू शेट्टी यांनी या आंदोलनाचं नेतृत्व केलं. शक्तिपीठ महामार्गासाठी शेतकऱ्यांच्या हरकती असताना, शासनाने शेतकऱ्यांवर दबाव आणू नये, कोणत्याही परिस्थितीत हा महामार्ग होऊ देणार नाही, असा इशारा शेट्टी यांनी यावेळी दिला.

****

आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर गोदावरी नदी स्वच्छ करून प्रदूषणमुक्त करण्याच्या मागणीसाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने आज नाशिक इथं रामकुंडात उतरून आंदोलन करण्यात आलं. गोदावरीचे पवित्र पाणी दूषित दुर्गंधित झाले असून, त्यामुळे भविष्यात कोणाला कुठल्याही प्रकारचा काही त्रास झाल्यास त्याला प्रशासन आणि व्यवस्थापन जबाबदार राहील, असं निवेदनात म्हटलं आहे. नदीची स्वच्छता चांगल्या प्रमाणात झाली पाहिजे, कारखान्यांसह इतर स्रोतातून येणारं दूषित पाणी नदीत सोडण्यास सक्त मनाई करण्यात यावी, पाणी पवित्र निर्मळ ठेवण्यासाठी योग्य तो पाठपुरावा करून कारवाई करण्यात यावी, आदी मागण्या निवेदनात करण्यात आल्या आहेत.

****